# नागरिक अधिकार


वर्ष १ ले. अंक १ ला. रायगड दिनांक १ ते ३१ जूलै २०११ पाने १६ किंमत २० रूपये

*माहितीचा अधिकार कायद्याचा प्रसार व प्रचार करणारे झुंजार मासिक !*

## 'टोल'




## च्या वाटमारीला मारा माहिती अधिकाराचा 'टोला'




## रेडिमेड प्रश्नावली

**माहिती अधिकारात सर्व सरकारी विभागांना कशी ,काय व कोणती माहिती मागावी ?**

**सतिश शेट्टीच्या बलिदानानंतरचे वर्ष ..**

*माहिती अधिकाराचे वापरले बळ*
*भ्रष्ट अधिकाऱ्याची झाली पळापळ !*



## लोकपाल : अण्णांचा व्यर्थ घालवला वेळ दिल्लीत सत्याला फाशी देण्याचा खेळ !

मासिक
**नागरिक अधिकार**

*संपादक*
सुभाष बसवेकर
*कार्यकारी संपादक*
गणेश काजळे पाटील
*संपादक मंडळ*
*जिल्हा प्रतिनिधी*
राजेश बने (मुंबई)
कु.शीतल कापूरे (नवी मुंबई )
आप्पासाहेब मगर (ठाणे)
रमेश खेतावत (पुणे )
प्रीतम यादव ( सातारा)
बालाजी आडसूळ (लातूर)
अविनाश मुठे (नागपूर)
देवीदास चौथमल (औरंगाबाद)

अंक दर महिन्याच्या १ तारखेला प्रसिद्ध होतो.अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.
सर्व वादविवाद (पनवेल,नवी मुंबई न्यायालय कार्यकक्षेत)

पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-९८, सेक्टर -१२ खारघर,
नवी मुंबई ४१०२१० महाराष्ट्र
मो ९२२३५१६९२०


E- mail :
mediamansubhash@gmail.com

# संपादकीय

हा देश १०० कोटी सामान्य माणसांच्या मालकीचा देश आहे. हे विधान फक्त बोलण्यासाठी आहे.(प्रत्यक्षात या देशातील २० टक्के शाही लोकांकडे ८० टक्के साधनसंपत्ती आहे तर ८० टक्के सामान्य माणसांकडे २० टक्का तूकडे आहेत.) तरीही आपण मानून चालू की हा देश १०० कोटी सामान्य माणसांच्या मालकीचा आहे.आणि हा देश सामान्य लोकांच्या मालकीचा असूनही हा कसा चालवायचा ? देशातील साधनांचा उपभोग कोणी केव्हा कसा आणि किती घ्यायचा ? याचा निर्णय केवळ काही मुठभर सत्ताधिश, छटाकभर नौकरशहा,पावशेर ठेकेदार आणि त्यांनी पाळलेले आतपाव गुंड यांची चांडाळ चौकडी घेताना दिसत आहे.आजकाल हा १०० कोटीचा देश या चांडाळ चोकडीने ओलीस ठेवला असल्याचे दिसत आहे.या देशात स्वातंत्र्यानंतरच्या साठ वर्षातही सामान्य माणसांला मूर्ख बनवून सर्वपक्षीय राज्यकर्ते, नोकरशहा, ठेकेदार आणि गुंड ही चौकडी राज्य करीत आलेली आहे. सामान्य माणसांना घटनेने व कायदेमंडळाने दिलेले शक्तीमान नागरिक अधिकार व हक्क मोठया प्रमाणात न वापरल्यामुळे .हे सर्व विचित्र चित्र निर्माण झाले आहे. मतदानाच्या हक्काचा अचूक वापर, माहितीच्या अधिकारांचा प्रभावी वापर, ग्राहक व मानवाधिकार हक्क, शिक्षण व अन्नाधिकार हक्क तसेच स्त्रिया, कामगार, बालके यांच्या अधिकारांचे रक्षण करणारे अनेक कायदे व अधिनियम आज अस्तीत्वात आहेत. मोठया संख्येने व मोठया प्रमाणात ही नागरिक हक्काची आयुधे वापरून आपण स्वराज्याचे सुराज्य करण्याचा संकल्प पूर्ण करूया !

इतरांना आनंद देत देत आपण खरा आनंद मिळवणे म्हणजे खरे जगणे होय.


# टोल




# च्या वाटमारीला मारा माहिती अधिकाराचा टोला

सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य रस्ते विकास महामंडळ केंद्रिय रस्ते विकास महामंडळ हे विभाग राज्यात टोल वसूलीचे काम करीत असून सर्व वाहनधारक आरटीओकडे वाहतूक कर भरतात तरीही ही टोल वसूली का केली जाते हे कळत नाही.

टोल च्या रूपाने जनतेची वाटमारी सुरूच आहे.महाराष्ट्रात दर पन्नास किलोमिटर मागे एक टोलनाका असे सरासरी प्रमाण असून शेकडो टोलनाके हा जिझिया कर सामान्य जनतेकडून वसूल करीत आहेत.यातील अनेक टोल नाक्यावर तर कसलीही पारदर्शकता नाही.टोल का सुरू केला आहे, तो किती दिवस सुरु राहणार आहे किती रक्कम वसूल झाल्याबरोबर तो बंद होणार आहे अशी कोणतीही माहिती जनतेसमोर न ठेवता ही वाटमारी सुरूच आहे.राज्यात कित्येक ठिकाणी टोलवसूलीची मुदत संपूनही बेकायदेशीर वसूली चालूच ठेवणे, जनतेला विस्वासात न घेता टोल चे दर वाढवणे, टोल वसूली करणारे ठेकेदार, संबंधीत खात्याचे अधिकारी यांच्या छूप्या यूतीमधून जनतेची वाटमारी सुरू असल्याची प्रकरणे यापूर्वी बाहेर आलेली आहेत. माहिती अधिकाराचा वापर करून माहिती अधिकार कार्यकर्ते अशा प्रकारावर अंकूश लावू शकतात. माहिती अधिकारात काम करणाऱ्या एक प्रतिष्ठित संस्थेच्या कागदपत्राचा प्रश्नावली तयार करण्यासाठी आधार घेतला आहे. या अंकात माहिती अधिकारात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी एक नमूना प्रश्नावली दिली असून यात आणखी काही मुद्दे घालून आपल्या भागातील टोल वसूली संदर्भातील माहिती मागवून टोल वसूलीच्या या पद्धतीमध्ये पारदर्शकता आणू शकता.



## माहिती अधिकार कार्यकर्त्यांना आवाहन

मित्रहो, सदर माहितीच्या मुद्दे विचारात घेऊन आपल्या भागातील टोल नाक्याची माहिती मागवा, ती प्रकाशीत करा.आपले अनुभव आमच्याकडे पाठवा

# माहिती अधिकार कार्यकर्त्यांनो या नमूना अर्जाचा आधार घ्या आणि आपल्या भागातील टोल नाक्याची माहिती विचारा

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

( जोडपत्र" अ "नियम ३ नुसार)

प्रति,जन माहिती आधिकारी

सार्वजनिक बांधकाम विभाग/ राज्य रस्ते विकास महामंडळ/ केंद्रीय रस्ते विकास महामंडळ

--------------------------------------------

१) अर्जदाराचे नांव - --------------------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता :------------------------------------------------------

३) माहितीचा विषय - ---------------------------या रस्यावरील/ पूलावरील टोल संदर्भात माहिती.

४) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (टोल सुरू करण्याचे ठरले तेव्हापासून आजपर्यंत)

१) ----------------------------------या रस्त्यावर/ पूलावर टोल नाका तसेच टोल आकारणी सुरू करताना रहदारीचा((vehicle flow))अभ्यास केला आहे काय ? असल्यास केव्हा केला ? सदर रहदारी अभ्यास /रहदारी सव्हेक्षण अभ्यास अहवालाची एक सत्यप्रत द्यावी. हा अहवाल कोणत्या सक्षम अधिकाऱ्यांनी केला त्याचे पदनाम व हुद्दा द्यावा.

२) टोल चे दर काय आहेत ? प्रत्येक प्रकारच्या वाहनागणिक तपशील द्यावा.तसेच हे दर ठरवताना काय वस्तूस्थिती विचारात घेतली आणि हे दर कोणत्या आधारावर घेतले त्यासंबंधीची कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत.

३)टोल किती वर्षासाठी घ्यावा याचा निर्णय घेताना काय वस्तूस्थिती विचारात घेतली त्यासंबंधी कागदपत्राच्या प्रति मिळाव्यात.

४)या टोल आकारणी संदर्भात जी टेंडर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली तसेच कोटेशनच्या आलेल्या निविदाच्या प्रती तसेच तुलनात्मक तक्ता द्यावा.

६) टोल चा ठेका देताना काढलेल्या वर्क आर्डर ची प्रत द्यावी.

७)टोल कधी सुरू झाला ? टोल आकारणी दरात किती वेळा व किती रूपयांचा बदल झाला ? सुरू झाल्यापासून आज पर्यंत किती रूपये वसूल झाले ? किती रूपये वसूल होणे अपेक्षित आहे ? टोल किती कालावधीच्या मुदतीपर्यंत सुरू ठेवण्याचे ठरले आहे ? केव्हा वसूली बंद कधी होणार याची तारीख किंवा कलावधी ठरला आहे काय ? असल्यास तपशील द्यावा.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती मी व्यक्तीश : घेऊन जाईन. टपालाने पाठवावी. रजि.पोस्ट/ स्पीड पोष्ट

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे/ नाही (नसल्यास दहा रूपयांचा कोर्ट फी स्टॅम्प चिकटवावा)

अर्जदाराची सही

ठिकाण :-------------

दिनांक : --------------------- नाव----------------------

मोबाईल नं. ----------

माणूस परिस्थितीचा निर्मिती नाही, तर परिस्थिती माणसाची निर्मिती आहे.

# टोल वसूली नव्हे ही तर जनतेची वाटमारी

महाराष्ट्रात प्रवास करताना वाहनधारकांना दर तीस-चाळीस किमी मागे एक रस्त्यावर टोलनाके जनतेची वाटमारी करीत असून यातून जनतेमध्ये रोष व उद्रेकाची भावना तयार झाली आहे.या रस्त्यावर किती टोल वसूल करणे अपेक्षित आहे ? किती टोल वसूल झाला ? आणखी किती दिवस टोल वसूल करायचा आहे ? असे कोणतेच पारदर्शक मुद्दे जनतेसमोर न ठेवताच शासनाने टोल वाढविणे ही राज्यातील टोल वसूली म्हणजे जनतेची वाटमारीच आहे.कारण ज्या जनतेकडून टोल वसूल केला जातो त्या जनतेला त्या रोडच्या झालेल्या कामाची सर्व माहिती द्यायला हवी.उदा. किती लांबीचा रोड आहे? किती लोकांचे टेंडर बोलवले होते ? किती टेंडर आले होते.जे टेंडर पास केले ते कशाच्या आधाराने पास केले , किती रकमेला पास केले, त्यासाठी सरकारने व्यावसायीकांबरोबर केलेला करार काय होता ? या सारखी इतर माहिती जनतेला व्हावी या साठी इंटरनेट वरून, पुस्तीकेच्या माध्यमातून जनतेला माहिती होणे आवश्यक आहे.

त्याच प्रमाणे २६ जानेवारी १९५० साली प्रजासत्ताक दिन साजरा झाला त्याच दिवशी जनता (प्रजा) या देशाची मालक झाली असून सर्व लोकप्रतिनिधी आणि अधिकारी जनतेचे सेवक झालेले आहेत.आमच्या तिजोरीतील पैशांचा विनियोग कसे करता हे विचारण्याचा मालक म्हणून जनतेचा मूलभूत हक्क आहे.त्याप्रमाणे एखाद्या प्रकल्पात उणिवा असतील ज्यामुळे सामाजिक व राज्याची हानी होत असते व त्यात सुधारणा होणार असतील तर जनतेला सूचना करण्याचाही हक्क आहे. टोल वर जमा होणाऱ्या पैशामध्ये पारदर्शकता व्हावी यासाठी प्रत्येक टोलवरती इलेक्ट्रानिक सिस्टीम बसवण्यात यावी.या मागणीमध्ये गैर काहिच नाही.राज्यातील प्रत्येक टोल वर इलेक्ट्रानिक मशीन बसवण्यात यावी या संबंधाने पूर्वी मा.अण्णा हजारे जूलै २०१० पासून शासनांशी पत्र व्यवहार केला आहे.तीन महिन्यापूर्वी उपोषणाचा इशारा दिला.मात्र तीन महिन्यात कोणतीही कारवाई झालेली नाही.हे सर्व इलेक्ट्रानिक पद्धतीने व्हावे त्या साठी सरकारला वेळ मिळावा म्हणून तीन महिन्याचा अवधी दिला होता.ज्या अर्थी टोल पद्धत इलेक्ट्रानिक नाही त्या अर्थी काही तरी हितसंबंध असावेत असा दाट संशय आल्याशिवाय राहत नाही.इलेक्ट्रानिक सिस्टीम मुळे जगामध्ये आश्चर्य कारक प्रगती



अल्लाउद्दीन शेख

महासचिव

भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन, राळेगण सिद्धी

**मा.अण्णा हजारे प्रणीत भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाचे महासचिव अल्लाउद्दीन शेख यांनी टोलटॅक्स संबंधी मांडलेले हे विचार नक्कीच चिंतनीय असे आहेत.**

झालेली आहे.इलेक्ट्रानिक सिस्टीममुळे जग जवळ आलेले आहे.त्या प्रमाणे प्रत्येक व्यवहारामध्ये आश्चर्यजनक पारदर्शकता आली आहे.अशा अवस्थेमध्ये राज्यातील प्रत्येक टोल इलेक्ट्रानिक सिस्टीम जोडून इंटरनेट वर ऑनलाईन त्यांची वस्तूस्थिती अपलोड करीत राहिल्यास संपूर्ण पारदर्शकता येईल. टोल नाक्यावर १०० मीटारवरून दिसेल अशा पद्धतीने इलेक्ट्रॉनिक्स पद्धतीने ॲटोमॅटीक चालेल अशा प्रकारचे इलेक्ट्रॉनिक्स बोर्ड (यंत्र) बसवावे ज्यामध्ये टोल चालवण्याऱ्या ठेकेदाराचे नाव,टोलचे कॉन्ट्रॅक्ट किती किंमतीला दिले आहे कॉन्ट्रॅक्ट दिलेली तारीख,अंतिम तारीख,नवीन टोल ज्या दिवशी सुरू झाला त्या दिवसापासून व ज्या टोलची मुदत बाकी आहे तो आकडा धरून टोलनाक्यावर वरच्या बाजूला,टोलच्या मध्यभागी दर्शनी भागावर इलेक्ट्रॉनिक्स डिजीटल बोर्ड दोन्ही बाजूला,व मध्यभागी दिसावा असा लावला पाहिजे.जेणे करून प्रत्येक वाहन टोलवरून जाताना टोल ज्या किंमतीला दिला आहे त्या किंमतीच्या आकडयापासून टोल सुरू होईल व प्रत्येक वाहनांची टोल आकारण्यात आलेली किंमत (रक्कम)आपोआपच टोल च्या एकूण रक्कमेतून होईल व नागरिकांना दिसेल की या टोलची बाकी किती राहिली आहे इलेक्ट्रॉनिक बोर्डावर ज्या दिवशी शून्य (झिरो) आकडा येईल त्या दिवशी टोल ची किंमत संपलेली असेल व टोल वसूला(ॲटोमॅटीक) कमी हे बंद केली जाईल.

*माहितीचा अधिकार कायद्याचा प्रसार व प्रचार करणारे झुंजार मासिक !*

# नागरिक अधिकार

## *आपण या अंकाचे वर्गणीदार व्हा !*

### आरटीआय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना एक आवाहन

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार व जागरूक नागरिकांकडून शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्येसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी यासाठी **नागरिक अधिकार** हे मासिक आपल्या सेवेत प्रसिद्ध होत असून या मासिकाचे आपण आणि आपल्या मित्रमंडळींनी वर्गणीदार व्हावे.वार्षिक वर्गणी २४०रूपये इतकी असून सदर वर्गणी संपादक,नागरिक अधिकार कार्यालय, ई-९८, सेक्टर १२ खारघर नवी मुंबई या पत्यावर मनिआर्डर किंवा डी.डी.ने पाठववी. आधिक माहितीसाठी ९२२३५१६९२० या क्रमांकावर संपर्क साधावा . तसेच कार्यकर्त्यांनी आपले माहिती अधिकार वापरताना आलेले अनुभव,आपल्या सक्सेस स्टोरीज् तसेच त्यांनी वापरलेले प्रभावी अर्जाचे नमूने, माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या कार्याचा परिचय, अशा प्रकारातील लेख व अनुभव लिहून पाठवावेत योग्य ती प्रसिद्धी दिली जाईल. मासिक नागरिक अधिकार हे माहिती अधिकारांचा वापर करून प्रशासन पारदर्शक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे आपले हक्कांचे व्यासपीठ असणार आहे.

आपल्या हक्काचे हे व्यासपीठ बळकट करण्यासाठी आपण नक्की सहकार्य कराल हा विस्वास आहे.

नेहमी भीतीत राहण्यापेक्षा एकदा धोका पत्करा. - थॉमस फुलर

# सतीश शेट्टी यांच्या हत्ते नंतर....



जगंलात हिरवळीवर कोवळया पाडसासह हरिणीचा कळप चरत असतो.तेव्हा झाडीमागे वाघ घात लावून बसलेला असतो. तो हरणांवर हल्ला करणार एवढयात झाडावरचे माकड चॅक् चॅक् चॅक् असा आवाज करून हरिणांना सावध करते.कळपांला संकटाची चाहूल लागते आणि ते सुसाट पळून जावून आपले प्राण वाचवतात. हा जंगलचा न्याय आजच्या भ्रष्ट जंगली समाजालाही लागू होतो.जेव्हा माणसांतली श्वापदे सर्वसामान्य जनतेच्या सार्वजनिक संपत्तीला गिळंकृत करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा माहिती अधिकारांचा वापर करणारे " व्हिसल ब्लोअर" जनतेला जागृत करतात.ही नैसर्गिक वृत्ती आता कोणी थांबवू म्हटले तरी थांबणार नाही.माणसे मारून सत्य गाडून टाकू असे जर काही विवेकभ्रष्ट प्रवत्तीला वाटत असेल तर तो मोठा भ्रम ठरेल.

माहिती अधिकार कार्यकर्ते सतिश शेट्टी यांच्या अमानुष हत्ते नंतर माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी करून प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी योगदान देणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांवर होणाऱ्या हल्ल्याविषयी समाज आणि विशेषत: मिडीया अधिक सतर्क झाला आहे.ही समाधानाची बाब आहे.

सतीश शेट्टी यांच्या हत्तेला जवळपास दीड वर्षे उलटून जावूनही पोलीसांना या प्रकरणाचे खरे धागेदारे अजूनही उलगडता आले नाहीत. ही खरे तर शरमेची बाब आहे.सतीश शेट्टी यांनी ज्यांच्या बेकायदेशीर व्यवहाराची माहिती मागीतली त्यांच्यातीलच कोणीतरी त्यांची हत्या करवून घेतली असणार यात तर शंकाच नाही.म्हणजे पोलीसांना खरे अपराधी विशिष्ट वर्तूळातील आहेत हे पक्के ठावून असूनही खऱ्या खून्यापर्यंत पोहचता आले नाही.यावरून पोलीसांच्या इच्छाशक्तीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते.

सतीश शेट्टी यांच्या हत्तेनंतर मुंबईत संतोष दौडकर या मुंबईतील माहिती अधिकार कार्यकर्त्यावरही बिल्डरांच्या गुंडानी जीवघेणा हल्ला केला होता.फलटण मध्ये एका कार्यकर्त्यांवर ग्रामपंचायत मधील अनाधिकृत बांधकामाविषयी माहिती मागीतली म्हणून तेथील स्थानिक कार्यकर्त्यावर हल्ला करून त्यांला गंभीर इजा करण्यात आली.जून २०११मध्ये ठाणे तसेच गुजरात येथेही काही कार्यकर्त्यांवर जीवघेणे हल्ले झाले.

गेल्या वर्षभरात महाराष्ट्रात माहिती अधिकार कार्यकर्त्यांना धमक्या देण्याचे शेकडो प्रकरणे पोलीसात नोंदवली असून सुमारे २५ हून अधिक कार्यकर्त्यांना मारहाण आणि जीवघेणे हल्ले झेलावे लागले आहेत.

आम्हाला जनतेने निवडून दिले आहे. सत्तेत आणि प्रशासनात आम्ही आम्हाला वाटेल तसे निर्णय घेऊ, आम्हाला वाटेल त्याप्रमाणे बेकायदेशीर पणे संपत्ती गोळा करून आम्हाला कोणीही काहीही विचारू नये. ही भूमिका सत्तेच्या वर्तूळात घेतली जात आहे.परंतु सत्ता ही अंतिमत: जनतेच्या हातात असते.जनता ही सार्वभौम आहे.आणि कोणी एक सामान्य माहिती अधिकार कार्यकर्ता ही त्या जनतेचा प्रतिनिधी असतो.आणि जनतेच्या हिताविरूद्ध जर काही होत असेल तर हा जनतेचा " जागल्या " पडद्याआडच्या अशा बेकायदेशीर घटनाविरोधात आवाज उठवल्याशिवाय राहणार नाही.सतीश शेट्टी यांची हत्या केली म्हणजे सत्य कायमचे गाडले जाईल हा त्यांचा भ्रम आहे.

## सक्सेस स्टोरीज

# माहिती अधिकाराचे वापरले बळ भ्रष्ट अधिकाऱ्यांची झाली पळापळ !

मुंबईच्या महात्मा फुले मंडईत पन्नास-साठ वर्षापूर्वी भाऊराव जाधव नावाच्या मराठी माणसानी सुरूवातील अक्षरशः सांगकाम्या नोकरापासून ते हमाली पर्यंत सारी कामे केली.पुण्याजवळील शिरूर भागातून आलेल्या या कष्टाळू माणसाने रस्त्यावर पथारी पसरून भाजी विकायला सुरूवात केली.नंतर मुंबईतून १९९०च्या आसपास शेतीमालाचे मार्केट वाशीच्या एपीएमसी परिसरात स्थलांतरीत झाले तेव्हा भाऊरावांनी वाशी मार्केट मध्ये आपले फळाचे दुकान सुरू केले.भाऊरावांना दोन मुले तुकाराम आणि सखाराम.थोरला तुकाराम दहावी शिकून एमएसईबी मध्ये शिपाई म्हणून नोकरीला लागला.धाकटा सखाराम भाऊरावांना व्यवसायात मदत करू लागला.व्यापार थोडा बऱ्यापैकी चालत होता.थोरल्या तुकारामचा दोन पैसे पगार मागे पडत होता.शिल्लक रकमेतून भाऊरावांनी तुर्भे परिसरात एक घर विकत घेतले.त्यांनी पुन्हा पूंजी जमा करून घर चांगले बांधून काढले.मुंबईत नशीब काढायला आलेल्या एका फाटक्या माणसाला निवारा झाला.पुढे तुकारामचे लग्न झाले आणि तो परिवारासह विक्रोळी येथे राहवयास गेला.सखाराम ने मात्र वडीलाचा व्यवसाय पुढे चालू ठेवला.

इकडे भाऊरावांचे काही काळानंतर निधन झाले. दोघा भावांना अत्यंत दु:ख झाले.चार दिवसानंतर जगरहाटीप्रमाणे ते दोघे आपापल्या व्यापात मग्न झाले.काही दिवस गेल्यानंतर तुकारामची नवी मुंबईत बदली झाली.त्याने सरकारी क्वार्टर सोडून आपल्या वडीलापार्जित घरी राहवायास याचे ठरवले. तुकारामने सखाराम समोर तूर्भे येथील वडिलोपार्जित घराच्या वाटण्या करण्याची मागणी केली.तेव्हा सखारामने स्पष्टपणे सांगितले की हे घर पूर्ण पणे माझ्या मालकीचे असून यात तुझा कसलाही हिस्सा नाही.तेव्हा हे घर आपल्या दोघांच्याही वडीलाच्या मालकीचे आहे यात आपणा दोघांचाही सारखाच हिस्सा आहे. तेव्हा माझा हिस्सा मला द्यावा.अशी तूकारामने परत मागणी केली. तेव्हा सखाराम ने हे घर पूर्णपणे माझ्या एकटयाने मालकीचे असून तशी सिडको मालमत्ता विभागात तशी नोंद असल्याची कागदपत्रे तूकारामला दाखवली.तसेच धक्के मारून घरातून बाहेर काढले.तुकारामच्या पायाखालील वाळू घसरली.आपणही वारस असताना एकटया सखारामच्या नावे घराची मालकी कशी झाली ? याचे कोडे तुकारामला उलगडेना.आपल्या भावाने आपली कशी फसवणूक केली याच विचारात तो राहिला. ही समस्या घेऊन तुकाराम नवी मुंबईतल्या माहिती अधिकार कायदा जागृती अभियान च्या कार्यकर्त्यांना भेटला. तेव्हा तेथील कार्यकर्त्यांनी तुकारामला माहिती अधिकार कायदयाचा वापर करण्याची सूचना केली. कार्यकर्त्यांच्या मदतीने तुकाराम ने सिडको मालमत्ता विभागाकडे माहिती अधिकारात अर्ज केला आणि त्याचा भाऊ सखारामने वडीलोपार्जित घर स्वत:च्या नावे करून घेताना कोणकोणती कागदपत्रे जोडली त्या कागपपत्राच्या सत्यप्रती द्याव्यात अशी मागणी केली.सिडको मालमत्ता विभागाने कागदपत्राच्या प्रती दिल्या.आणि कागदपत्रे पाहताच सखारामने तुकारामची कोठे फसवणूक केली हे उघड झाले. मालमत्ता विभागाकडे घराची मालकी हस्तांतरीत करताना सखारामने आपण वडील भाऊरावांचें एकमेक वारस आहोत असे दर्शविणारी गावाकडील तलाठयांने दिलेली वारसपंजी ची प्रत जोडली होती.मग तुकारामने गावच्या तलाठयाकडे माहिती अधिकार अर्ज करून भाऊरावांना दोन मुले असताना एकटा सखारामचे कसा वारस ठरतो ? असे विचारून कोणत्या कागदपत्राच्या आधारे सखाराम हा एकमेक वारस असल्याचे प्रमाणपत्र दिले ? तसा पंचनामा कोणाच्या उपस्थितीत करण्यात आला ? पंचनाम्याची प्रत द्यावी.अशी मागणी केली.तुकारामचा हा माहिती अधिकारातील अर्ज पोष्टाने गावाच्या तलाठ्याच्या हातात पडताच.सुटकेस घेऊन तलाठ्याने रात्रीच्या गाडीने मुंबई गाठली.सखारामकडून लाच घेऊन खोटे वारसपत्र दिल्याने तलाठी अडचणीत आला होता.त्याला आपली नोकरी जाईल, बदनामी होईल अशी भीती वाटू लागली.मुंबईत त्याने सखाराम ला गाठले आणि सखारामने आपल्याला खोटी माहिती देऊन वारसपत्र घेतले अशी तुकारामला लेखी माहिती देवू आणि तसेच खोटया वारसपत्राच्या आधारे सिडको मालमत्ता विभागाकडून वडीलाच्या नावाचे घर स्वत:च्या नावे करून घेतले अशी तक्रार करूअशी धमकी दिली.या धमकीमुळे सखाराम सूतासारखा सरळ झाला.व तुकारामला घरातील अर्धा हिस्सा द्यायला तयार झाला.मग सखाराम, तुकाराम, तलाठी व नवी मुंबईतील माहिती अधिकार चळवळीतील काही कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत एक मिटींग होऊन सखारामने तुकारामला घरातील अ र्धा हिस्सा देण्याच्या संदर्भात लेखी करार करण्यात आला.केवळ माहिती अधिकारा कायद्यानुसार दोन अर्ज केले आणि तुकारामला त्याच्या हक्काचे घर मिळाले.

रोखठोक मत

# दिल्लीत सत्याला फाशी देण्याचा खेळ !

लोकपाल विधेयकावरून केंद्र सरकार आणि अण्णा हजारे यांच्यात पुन्हा एकदा संघर्ष होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.अण्णांच्या ४ एप्रील च्या उपोषणानंतर केंद्र शासनाने लोकपाल मसुदा समिती निर्माण केली.गेल्या तीन महिन्यात समितीच्या नऊ बैठका झाल्या या बैठकीमध्ये मा.अण्णा हजारे यांच्या प्रतिनिधीना विरोध करण्याचे कामच सरकाच्या प्रतिनिधींनी केले.मसुदा समितीच्या बैठका म्हणजे जनतेला मूर्ख बनविण्यांचा आणि मा.अण्णा हजारे यांच्या म्हणजेच पर्यायाने जनसामांन्याच्या प्रतिनिधीना केवळ खेळवत ठेवण्याचा प्रयत्न सरकारमधील मंत्री प्रतिनिधीनी केला आहे.आता तीन महिने चर्चेचे गुऱ्हाळ चालवल्यानंतर जनतेचा एक मसुदा आणि सरकारचा एक मसुदा असे दोन मसुदे मंत्रीमंडळ बैठकीत ठेवण्यात येणार असल्याचा निष्कर्ष काढला गेला.खरे तर एवढाच निष्कर्ष काढायचा होता तर एक दोन बैठकामध्येच हे काम करता आले असते यासाठी नऊ बैठका आणि तीन महिने कालहरण करण्याची काय गरज होती हे समजत नाही.गेल्या तीन महिन्यात व्युहरचना करून, चलाख पद्धतीने जनतेला व अण्णांच्या प्रतिनिधींना झुलवत ठेवून केंद्र सरकाने सत्याला फाशी देण्याचा खेळ केला आहे.

संसद सार्वभौम आहे.लोकपालला अधिक अधिकार दिले तर तो संसदेला आव्हान देईन.अशी भीती दाखवून आता अन्य राजकीय पक्ष आणि जनतेमधील काही लोकांना फोडण्याचा कुटील डाव सरकार खेळत आहे.ज्या खासदारांनी पैशासाठी स्वत:च्या मतांचा घोडबाजार करून संसदेत पक्षाच्या आदेशाविरूद्ध मतदान केले.पैशे घेऊन प्रश्न विचारले.खासदारांची खरेदी -विक्री करण्यासाठी नोटांची बंडले संसदेत आणली.हा सगळा दी ग्रेट इंडियन ड्रामा लोकांनी पाहिलेला आहे.संसदेची प्रतिष्ठा व संसदेचे सार्वभौम या विषयी सर्वसामान्य माणसांनी नेहमीच आदर केला आहे.परंतु संसदेची प्रतिष्ठा धुळीला मिळवण्याचे काम नेहमीच संसद प्रतिनिधीनींच केले असलेले दिसून येते.संसद चालू असताना खासदार जो गोंधळ घालतात त्यांवरून अशा संसद प्रतिनिधीची लायकी समजून येते.संसदेत आणि सत्तेत आम्ही काहीही करू आम्हाला जबाबदार धरू नका असे म्हणणे म्हणजे सामंतशाहीचे लक्षण आहे.ही सामंतशाही पुढे चालून लोकशाहीला घातक ठरू शकते.तेव्हा वेळीच सावध होण्याची गरज आहे.संसद श्रेष्ठ आहेच परंतु निवडणूकीत बेकायदेशीर मार्गाने प्रचंड पैसा खर्च करून, लोकांना पैसे देऊन मते विकत घेऊन निवडून आलेल्या संसद प्रतिनिधीनी राजकारणात सुरू केलेल्या भ्रष्ट व गुंड प्रवत्तीच्या गचाळ राजकारणामुळे संसदेची प्रतिष्ठा पणाला लागलेली आहे.लोकपाल विधेयकांला छूपा विरोध करणाऱ्या कपील सिब्बल, सलमान खुर्शीद, चिदंबरम अशा मंत्र्यांनी अगोदर हे गचाळ झालेले राजकारण स्वच्छ करून दाखवावे, भ्रष्ट व्यवस्था पूर्ण पारदर्शक व जनतेप्रती जबाबदार होईल हे अगोदर करून दाखवावे आणि नंतरच लोकपालची आवश्यकता नाही. अश्या वल्गना कराव्यात.

अण्णा हजारे यांचा आवाज हा केवळ एक व्यक्तीचा आवाज नाही.हा जनतेचा आवाज आहे.हा आवाज आता कोणत्याही सरकारला दाबता येणार नाही.चोवीस तास कष्ट करून देशाचे उदरभरण करणारा शेतकरी, दिवसभर कष्ट करून राबणार कामगार, महिला, युवक असा सामान्य स्तरावरील खूप मोठा वर्ग प्रामाणिक आहे म्हणून हा देश चालतो आहे.या वर्गाच्या भावभावनांची अभिव्यक्ती अण्णांच्या मुखातून होते आहे. लोकांच्या मनात असंतोष खदखदतो आहे.या असंतोषाचा लाव्हा होऊ नये याची खबरदारी घेणे आणि वेळीच जनतेच्या आकांक्षांची पूर्तता करणे ही सरकारची जबाबदारी आहे.खोटी व्हाउचर दाखवून राजकारणी मात्र क्षणभरात लाखो-कराडोची आफरातफर करतात.साधा ग्रामपंचायतचा ग्रामसेवक सुद्धा शे दोनशे घेतल्याशिवाय जन्म -मृत्यूचा दाखला देत नाही.असा भ्रष्टाचार वरपासून खालपर्यत पसरला आहे. या भ्रष्टाचाराला लगाम घालण्यासाठी एक सशक्त यंत्रणा उभारणे ही आज काळाची गरज निर्माण झाली आहे.केवळ लोकपाल च्या नावाने एखादा जोकपाल निर्माण करून आता सरकारने जनतेला मुर्ख बनवू नये.

- सुभाष बसवेकर

# भारतीय नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि हक्क

## (संदर्भ भारताचे संविधान)

### स्वातंत्र्याचा हक्क

१) सर्व नागरिकांस -

क)भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा हक्क आहे.

म्हणजेच प्रत्येक नागरिकांस

ख)शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचा हक्क आहे.

ग)अधिसंघ व संघ बनवण्याचा हक्क आहे.

घ)भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा हक्क आहे.

ड)भारताच्या राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा हक्क आहे

छ) कोणताही पेशा आचरण्याचा अथवा कोणताही व्यवसाय,व्यापार किंवा धंदा चालवण्याचा हक्क आहे.

### समानतेचा हक्क

१) भारताच्या कोणत्याही नागरिकांस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापूढे समानता अथवा कायद्याचे सरंक्षण नाकारले जाता कामा नये.

२) कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे केवळ जात,धर्म,वंश,लिंग अथवा जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करता येणार नाही.


३) अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे.व तिचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिध्द करण्यात आले आहे.अस्पृश्यतेतून उद्‌भवणारी कोणतीही नि:समर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध आहे.जीवीत व व्यक्तीस्वांतंत्र्य यांचे सरंक्षण कायद्याने प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवीत किंवा व्यक्तीस्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही.

### शिक्षणाचा हक्क

सहा वर्षापासून ते चौदा वर्षापर्यंतच्या मुलांना कायद्याने ठरविल्यानुसार शिक्षण मिळवण्याचा हक्क आहे.

विवक्षित प्रकरणी अटक व स्थानबद्धता यापासून सरंक्षण

१) अटक झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा अटकेची कारणे,




शक्य तितक्या लवकर कळवल्याशिवाय, हवालातील स्थानबद्ध करण्यात येणार नाही किंवा आपल्या पंसतीच्या विधीव्यवसायी घेण्याचा व त्याच्याकरवी बचाव करण्याचा हक्क तिला नाकारला जाणार नाही.

२) जिला अटक केली आहे व हवालातीत स्थानबद्ध केले आहे अशा प्रत्येक व्यक्तीला अटकेच्या ठिकाणापासून सर्वात जवळच्या दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयापर्यंतच्या प्रवासास आवश्यक असलेला अवधी वगळून अशा अटकेपासून चोवीस तासाच्या कालावधीत त्या दंडाधिकाऱ्यापुढे हजर केले जाईल आणि अशा कोणत्याही व्यक्तीला उत्क कालावधीनंतर अधिक काळ दंडाधिकाऱ्याने प्राधिकृत केल्याशिवाय हवालातीत स्थानबद्ध करण्यात येणार नाही.

### शोषणाविरूद्धचा हक्क

१) माणसांचा अपव्यापार आणि बिगारी व त्या सारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे.आणि

या तरतूदीचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

२) चौदा वर्षे वयाखालील कोणत्याही बालकास, कोणत्याही कारखान्यात अथवा खाणीत काम करण्यासाठी नोकरीत ठेवले जाणार नाही. अथवा अन्य कोणत्याही धोक्याच्या कामावर त्यास लावले जाणार नाही.

## धर्म स्वातंत्र्याचा हक्क

१) सार्वजनिक सुव्यवस्था,नीतिमत्ता व आरोग्य यांच्या व या भागातील अन्य तरतूदीच्या अधीनतेने ,सद्सद्विवेकबुद्धीच्या स्वातंत्र्याला आणि धर्म मुक्तपणे प्रकट करण्याच्या, आचरण्याच्या व त्याचा प्रचार करण्याच्या अधिकाराला सर्व व्यक्ती सारख्याच हक्कदार असतील.

## सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क

१) भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक गटाला आपली भाषा, लिपी वा संस्कृती असेल ती जतन करण्याचा हक्क असेल.

२) राज्याकडून चालवल्या जाणाऱ्या किंवा राज्य निधीमधून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकांस केवळ जात,धर्म,वंश ,भाषा किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

## गुन्ह्यांची नोंद करून घेण्याचा अधिकार

तुमच्यावर झालेल्या अन्याय व अत्याचारांची माहिती पोलीसांना दिली तरी तुमच्या तक्रारीनुसार जर पोलीस गुन्हा नोंदवून घेत नसतील. प्रथम तपास रिपोर्ट (एफ. आय.आर.)नोंदवत नसतील *तर यासंबंधीची तक्रार तुम्ही पोलीस कमीशनर यांना करू शकता तसेच संबंधीत पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील न्यायीक दंडाधिकारी / न्यायाधिय यांच्याकडेही दाद मागू शकता.*

## *भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्ये*

*क) संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श व संस्था,राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.*

*ख) ज्यांच्यामुळे आपल्या राष्ट्रीय लढ्यास स्फूर्ती मिळाली या उदात्त आदर्शाची जोपासना करून त्याचे अनुसरण करणे;*

*ग)भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत ठेवणे व त्यांचे सरंक्षण करणे.*




*घ) देशाचे सरंक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.*

ड) धार्मिक,भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदाच्या पलिकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंज्यस व बंधूभाव वाढीला लावणे ;स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.

छ) वने, सरोवरे,नद्या व वन्य जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सूधारणा करणे.आणि प्राणीमात्राबद्दल दयाबुद्धी *बाळगणे.*

*ज) विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन,मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.*

*झ) सार्वजनिक* मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

त्र ) राष्ट्र सतत उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशाप्रकारे सर्व व्यक्तीगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे.

ही प्रत्येक नागरिकांची कर्त्यव्ये असतील.

ट) जो जन्मदाता असेल अथवा पालक असेल त्याने, आपल्या अपत्यास अथवा पाल्यास, त्याच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते चौदाव्या वर्षापर्यंत संधी उपलब्ध करून देणे.

# आमदार निधीत घोटाळा ?

## आपल्या भागातील आमदारांची निधीचा हिशोब मागा.

महाराष्ट्राच्या विधीमंडळात विधानसभा आणि विधानपरिषद ही दोन सभागृहे आहेत. विधानसभेत २८९ आणि विधानपरिषदेत ७८ आमदार आहेत.ही एकूण संख्या होते ३६७ इतकी. या सर्व आमदारांना प्रत्येक वर्षाला प्रतिआमदार एक कोटी (अलिकडेच वाढीव घोषणा झाली आहे प्रतिवर्ष दीड कोटी इतका निधी देण्याची )इतका विकास निधी मिळतो. या निधीमधून आमदार त्यांना योग्य वाटेल अशा विकास कामासाठी निधी देऊ शकतात. हा सर्वस्वी आमदारांच्या इच्छे नुसार वितरीत होते. मात्र या वितरणावर जिल्हाधिकारी यांचे नियंत्रण असते.तसेच या निधीच्या दैनंदिन व्यय व्यवस्थापनाचे काम जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यकक्षेतील जिल्हा नियोजन समितीकडे असते. परंतु हा विकास निधी कोणत्या सार्वजनिक कामासाठी द्यावा. कधी द्यावा, किती द्यावा हे सर्वस्वी आमदार महोदयांच्या इच्छेनुसार ठरते.

महाराष्ट्राच्या विधीमंडळातील हाताच्या बोटावर मोजता येतील इतकेच लोकप्रतिनिधी सोडले तर या निधीचा वापर करताना बहूतांश आमदारांनी व्यापक सार्वजनिक हिताला हरताळ फासून आपल्या नातलगांचे हित, आपल्या कार्यकर्त्यांचे हित, आपल्या पक्षाचे हित आणि आपणच पोसलेल्या कंत्राटदाराचे हित पाहतात.असा आजवरचा अनुभव आहे.

आमदार हे खरे तर जनतेचे प्रतिनिधी आहेत.त्यांनी घेतलेल्या विकास निधीच्या खर्चात खरे तर जनतेच्या विकासाचे प्रतिबिंब दिसायला हवे.परंतु बरेच आमदार या निधीचा मनमानी असा वापर करताना दिसत आहेत.मुंबईतील काही माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी या आमदारांच्या विकास निधी ची माहिती अधिकार कायद्यान्वये मागवली असता.त्यात आश्चर्यकारक अशी अनियमिता आढळली.अंगणवाडीच्या नावाने बांधलेल्या इमारतीत सदरील आमदारांच्या पक्षाचे कार्यलय काही कार्यकर्ते चालवत असलेले आढळूनआले.तसेच आमदार निधीच्या खर्चातही मोठी संधिग्धता असलेले दिसून आले.आमदार निधी जरी आमदारांनी स्वच्छेने वापरायचा निधी असला तरी तो खऱ्या अर्थाने जनतेचा पैसा आहे.जनतेला दरवर्षी खर्च होणाऱ्या पाचशे कोटी रुपयांचे होते तरी काय याचा हिशेब मागण्याचा पूर्ण अधिकार आहे.म्हणून माहिती अधिकार या कायद्याचा वापर करुन आरटीआय कार्यकर्त्यांनी या निधीचा हिशेब तपासून या निधीच्या विनीयोगात आधिक पारदर्शकता कशी आणता येईल ? हे पाहिले पाहिजे.

## आपल्या परिसरातील रेशन दुकानांची माहिती मागवा व त्यावर अंकूश बसवा.

महाराष्ट्रातील स्वस्त धान्य / रेशन / शिधावाटप कार्यालयात व दुकानातून मोठया प्रमाणात अन्नधान्य, तेल व रॉकेल काळया बाजारात विकले जाते.यातून दुकानदारांना व पूरवठा खात्यातील भ्रष्ट अधिकाऱ्यांना मालमाल होता येते.परंतु त्यांचवेळी गरीबांचे हक्काची भाकरी हिरावून घेतली जाते.अशा सर्व दुकांनाची माहितीचा अधिकार वापरून या दुकान चालकांच्या मनमानीला अंकूश लावता येतो.या दुकानांतील मालाचा स्टॉक,विकी, शिल्लक साठा किती हे माहिती अधिकारात विचारता येते.विकी रजिस्टर,तकार वही, निरिक्षकांनी दुकांनाची तपासणी केलेले अहवाल याची मागणी करता येते.या अंकात एक नमूना माहिती अधिकार अर्ज दिला आहे.त्यात आणखी भर घालून तुम्ही आपल्या परिसरातील स्वस्त धान्य दुकानाची माहिती पूरवठा विभागाकडे मागवा.

## आपल्या परिसरातील अनुदानीत शाळा / आश्रमशाळा यांची माहिती मागवा .

महाराष्ट्रातील हजारो अनुदानीत शाळामधून फी व देणगी च्या नावाखाली विद्यार्थ्यांची पिळवणूक केली जाते.तसेच अनेक आश्रम शाळामधून भ्रष्टाचार व गैरव्यवहार चालतात.माहिती अधिकाराचा वापर करून आरटीआय कार्यकर्ते या वर नियंत्रण आणू शकतात.या अंकात एक नमूना अर्ज दिला आहे त्याचा आधार घेऊन आपल्या परिसरातील अनुदानित शाळा तसेच आश्रमशाळांची माहिती मागवा.

माणूस थकल्यानंतरही बरेचसे अतर चालू शकतो

# आमदार विकास निधीचा हिशेब तपासण्यासाठी माहिती अधिकाराचा नमूना

## केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार अर्ज

(जोडपत्र "अ" नियम ३ पहा )

प्रति,

जनमाहिती अधिकारी

जिल्हाधिकारी कार्यालय

---------- जिल्हा.

१) अर्जदाराचे नांव - ----------------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता:----------------------------------------------------

३) माहितीचा विषय :----------- या मतदार संघातील आमदारांच्या विकास निधीची माहिती

४) माहितीचे वर्णन आणि कालावधी (खालील मुद्याप्रमाणे)------------ मतदारसंघातील आमदार श्री /श्रीमती -------------------- यांच्या ---------- पासून आज तारखेपर्यंतच्या आमदार विकास निधीचा मंजूरी,विकासकामे,खर्च व नियमनाची खालील मुद्येनिहाय माहिती मिळणेबाबत

अ) आमदार निधीतून कोणकोणती कामे पूर्ण झाली ?कोणकोणती कामे चालू आहेत ? कोणकोणती कामे प्रस्तावित आहेत.प्रत्येक विकास कामावर किती निधी खर्च झाला ? खर्च झालेला वर्ष निहाय निधी तसेच न वापरलेला शिल्लक निधी किती आहे? यांची माहिती द्यावी.

ब) आमदार विकास निधीचे प्रत्येक काम कोणत्या ठेकेदारास देण्यात आले? त्या साठी निविदा मागविलया होत्या काय? प्रत्येक कामाच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता द्यावा

क) आमदार विकास निधी वापर कोणत्या कारणासाठी व कसा करावा या विषयीचे शासनाचे नियम, नियमन, कायदा किवां अद्यादेश यांच्या सत्यप्रती उपलब्ध करुन द्याव्यात.

ड) आमदारांनी विकासकामासाठी विनंती किंवा आदेश दिल्यानंतर काम पूर्ण होईपर्यंत कामाची प्रक्रिया कशी असते ?कामाची मंजूरी ते काम पूर्ण होईपर्यतचे निकष काय असतात ?

ँई ) आमदार विकास निधीमधून कोणकोणती कामे करावीत याचे काही प्राधान्यक्रम शासनाने ठरवले आहेत काय ?

फ)

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती मी व्यक्तीश: घेऊन जाईन.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे /नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण : (नाव : )

दिनांक : मोबाईल नंबर

# रेशन दुकानांची स्थिती तपासण्यासाठी माहिती अधिकाराचा नमूना

## केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार अर्ज

## (जोडपत्र “अ” नियम ३ पहा )

प्रति,

जनमाहिती अधिकारी

शिधावाटप नियंत्रण अधिकारी) पूरवठा अधिकारी

तहसील कार्यालय / शिधावाटप कार्यालय

-------------------------------

१) अर्जदाराचे नांव - -------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता : ----------------------------------------------

३) माहितीचा विषय - शिधावाटप कार्यालय यांच्याकडून खालील माहिती मिळणेबाबत.

अ) आपल्या कार्यालया अंतर्गत किती स्वस्त धान्य दुकाने आहेत त्यांचे नाव आणि पत्ते द्यावेत ?

ब) आपल्या कार्यालयात अंतर्गत असलेल्या दुकान नंबर ..... स्वस्त धान्य दुकानामध्ये आलेला माहे .... सन २०११ आलेला अन्नधान्य व तेल व रॉकेलचा विक्री झालेला कोटा,शिल्लक कोटा व पुढील महिन्यात समायोजित झालेला कोटा आदि नोंदी असणाऱ्या रजिस्टरची सत्यप्रत द्यावी. विक्री पावती बूकाची सत्यप्रत द्यावी.

क) सन २०१० मध्ये या तक्रार वहया मधून किती तक्रारी प्राप्त झाल्या ?तक्रार आलेल्या स्वस्तधान्य दुकानदारांविरूद्ध काय कारवाई करण्यात आली ?केलेल्या कारवाईचा तपशील तक्रारदारांस लेखी कळविला काय ? असल्यास संबधीत पत्रव्यवहाराच्या सत्य प्रती मिळाव्यात

ड) सन २०१० आणि सन २०११ च्या आज तारखेपर्यत आपल्या अधिकारा अंतर्गत येणाऱ्या सर्व शिधावाटप दुकानदाराकडील तक्रारवहीत आलेल्या तक्रारीच्या सत्यप्रती उपलब्ध करून द्याव्यात.

ई) आपल्या कार्यालयाअंतर्गत असणा-या घाऊक रॉकेल विक्रेत्यांची संख्या किती ? प्रत्येक दुकानाच्या दर्शनी भागावार दुकानाचे नाव आणि पत्ता, विक्रीदर,स्थानिक दक्षता समिती सदस्यांचे नाव व पत्ते,लोकसंख्या व युनिट, वितरण प्रमाण,तसेच तक्रार करावयाच्या आधिका-याचे नाव पत्ता व फोन नंबर असा विस्तृत व परिपूर्ण माहिती असणारा फलक लावला आहे काय ?असल्यास असे बोर्ड प्रत्येक दुकानात लावले असल्याचे सक्षम अधिकाऱ्यांच्या निरिक्षण अहवालाची प्रत द्यावी.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती मी व्यक्तीश: घेऊन जाईन / टपालाने पाठवावी.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे /नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण :-------------

दिनांक -------------- मोबाईल ------------------

सत्याने जेव्हा बूटही चढवलेले नसतात तोपर्यंत असत्य पहायला सुरू करते. मात्र जिंकते शेवटी सत्य

# अनुदानित शाळा / आश्रमशाळांची माहिती मागवण्यासाठी नमूना अर्ज

खेंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार अर्ज
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)
प्रति,

जनमाहिती अधिकारी
शाळा / कॉलेज ----------------
पत्ता -----------------

१) अर्जदाराचे नांव - ------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता :----------------------------------

३) माहितीचा विषय - आपल्या हायस्कूल/ कॉलेजसंबंधी माहिती मिळणे बाबत

४) माहितीचा कालावधी २०१०-२०११

अ )शैक्षणिक वर्ष जून २०१० ते मे २०११ मध्ये आपल्या शाळेत विद्यालयात इयत्ता १ ली ते १० पर्यंत विद्यार्थी संख्या किती होती ?

ब ) शैक्षणिक वर्ष जून २०१० ते मे २०११ मध्ये आपल्या विद्यालयात एकूण किती शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत होते प्रत्येकांा किती मासिक वेतन मिळते.

ई) आपले विद्यालय,महाविद्यालय आपली संस्था ज्या सार्वजनिक न्यासांच्या नावाने चालविले जाते तो न्यास कोणत्या धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदविला आहे. ? त्याचा सविस्तर पत्ता द्यावा. तसेच संचालक मंडळाची यादी द्यावी.

फ)आपल्या संस्थेलाव शाळेला शासनाकडून २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षात किती अर्थिक अनुदान मिळाले.अनुदानाचा सविस्तर तपशील द्यावा. अनुदान कोणत्या कारणासाठी कधी खर्च झाले.किती शिल्लक आहे.तपशील दर्शविणारी कागदपत्रे द्यावीत.

ग) आपण विद्यार्थ्यांकडून देणगी फंड / विकास निधी किवा अन्य कारणाखाली रूपये शुल्क घेता काय ? घेत असल्यास आजपर्यंत आपल्याकडे किती रूपये विकास निधी जमा झाला.याचा विनी योग कसा झाला याचा तपशील कागदपत्रे द्यावा.

ह )आपल्या शाळेची / विद्यालयाची वार्षिक तपासणी / नियतकालीक तपासणी केव्हा व कोणत्या सक्षम अधिकाऱ्यांनी केली तपासणी दिनांक / वेळ तसेच अधिकाऱ्याचे पदनाम व हुद्दा द्यावा. तपासणीमध्ये अधिकाऱ्याने तपासणी बूकात मारलेले शेरे व टिपण्णी याच्या सत्यप्रती द्याव्यात.

४) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती मी व्यक्तीश : घेऊन जाईन.

५) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही ( १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

*अर्जदाराची सही*

*ठिकाण :---------------------*

*दिनांक : ----------------------* *(नाव :----------------------)*

मोबाईल : ------------------

पैशाने आनंद मिळण्याची खात्री नाही. तुमच्या पसंतीचे दु:ख मात्र निश्चित मिळते

शेवटचे पान ..

# प्रेरणा जीवनाला ऊर्जा देणार इंधन !

## ‘ देणे ’ एक चिंतन

जीवनातला एक अविभाज्य नियम म्हणजे देणं आणि घेणं.जगातली प्रत्येक व्यक्ती इतरांना काहीतरी देत असतें आणि त्या बदल्यात काहीतरी मिळवत असते.जगराहटीच्या तमाम व्यवहारात मला काय मिळेल ? याचाच बहूतांश लोक विचार करीत राहतात.मी समाजाला काय देतो ? याचे चिंतन ते करीतच नाहीत.तुम्ही इतरांना तुमच्या क्षमतेप्रमाणे अधिकाधिक उत्तम सेवा देत राहा.या बदल्यात मला काय व किती मिळेल याचा हिशोब करुच नका.तुम्ही देण्या-घेण्यातील तुलना करण्यात तुमचा वेळ घालवूच नका.तुम्ही जे देता त्याच्या मोबदल्यात तुम्हाला काहीतरी अधिक आणि चागले प्रतिफळ मिळणार म्हणजे मिळणारचं. सुरूवातीला ते प्रतिफळ पैसा,नावलौकीक, विस्वासाहर्ता, गुडवील अशा स्वरूपात प्राप्त होते. व नंतर नावलौकीक, विस्वासाहर्ता व गुडवील मुळे तुम्हाला मिळणाऱ्या संपत्तीत कित्येक पटीने वाढहोत राहते.लक्षात ठेवा, उत्तम सेवा दिली की त्याचा उत्तम परतावा परत मिळतो हा निर्सगाचा नियम आहे.

## ‘ मुठभर अधिक ’ ची जादू

एका भाजी बाजारात एक भाजीवाली भाजी विकायची.ग्राहकांनी पाव किलो,अर्धा किलो वांगी घेतली की माप पिशवीत टाकल्यानंतर ती एखादं वांगं वरून ग्राहकांच्या पिशवीत टाकायची.बटाटे घेतले की एखादे बटाटे अधिकचे पिशवीत टाकायची.शेंगा घेतल्या की मुठभर शेंगा अधिक द्यायची.

मापापेक्षा मूठभर अधिक देत राहिल्यामुळे तिला व्यवसायात कधी तोटा किंवा नूकसान तर झाले नाहीच.उलट ती बाजारातील अतिशय फेमस व ग्राहकांची आवडती भाजी विक्रेती बनली.ग्राहकांना अपेक्षेपेक्षा मूठभर अधिक देत राहिल्यामुळे बाजारातील इतर विक्रेत्यापेक्षा तिची भाजी दुप्पट तिप्पट अधिक विक्री व्हायची.त्यातून तिला भरपूर नफा मिळत राहायचा. आपल्या ग्राहकांना अपेक्षेपेक्षा एक मुठभर अधिक दिलं तर ओंजळभर अधिक मिळतं ही जादू त्या भाजी विक्रेतीला कळली होती. आपणही इतरांना जे देतो त्यात अपेक्षेपेक्षा थोडसं अधिक देण्याचा मंत्र कृतीत आणायला काय हरकत आहे ?

प्रति,

पाठविणार
पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लॉट नं. ई-१८, सेक्टर-१२ खारघर,
नवी मुंबई ४१०२१० महाराष्ट्र
मो ९२२३४८६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे छापून स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय,सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथेच प्रकाशीत केले.